**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को.ऑप.असोसिएशन लि;**
**११३ (अ), सिद्धेश्वर पेठ, (एस.बी.आय. ट्रेझरी शेजारी) सोलापूर-४१३००१.**

## पाहिजेत

पश्चिम महाराष्ट्रातील रुपये पाच हजार कोटी व्यवसायपूर्तीकडे वाटचाल असलेल्या एका अग्रगण्य शेड्यूल्ड सहकारी बँकेत खालील पात्रता पूर्ण करणाऱ्या इच्छुक उमेदवारांकडून खाली नमूद पदासाठी विहीत नमुन्यात https://surbanksassociations.com/ या संकेतस्थळावर Online पद्धतीने अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ. नं. | पदनाम | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा (दि.३१ डिसेंबर २०२३ रोजी) | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १) | **लिपिक** | **आवश्यक**<br>१. मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी<br>२. MS_CIT किंवा Equivalent Certification Course<br>**प्राधान्य-**<br>बी.कॉम/एम.कॉम/एम.बी.ए./JAIIB/CAIIB/GDC&A तसेच शासन मान्यताप्राप्त इतर संस्थेची बँकिंग/ सहकार /कायदेविषयक पदविका/Banking Course | किमान २२ ते कमाल ३५ वर्षे | बँका/पतसंस्था किंवा वित्तीय संस्थांमधील कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य |
| २) | **शिपाई** | किमान १० वी उत्तीर्ण | किमान २१ आणि कमाल ३३ वर्षे | - |
| ३) | **वाहनचालक** | किमान ८ वी उत्तीर्ण (चार चाकी वाहन चालविण्याचा (TR/NT) परवाना आवश्यक) | किमान २५ आणि कमाल ४० वर्षे | चार चाकी वाहन चालविण्याच्या परवान्यासह किमान ३ वर्षांचा अनुभव |
| ४) | **सुरक्षा रक्षक** | किमान ७ वी उत्तीर्ण | किमान २१ आणि कमाल ४५ वर्षे | - |

- **परीक्षा शुल्क** :- सर्व पदांसाठी लेखी परीक्षा शुल्क रु.१,०००/- अधिक १८% जीएसटी असे एकूण रुपये १,१८०/- इतके राहील.
- Online पद्धतीने अर्ज करण्याची मुदत दि.२४ जानेवारी २०२४ ते दि.०५ फेब्रुवारी २०२४ पर्यंत राहील.
- संपूर्ण तपशीलासह जाहिरात https://surbanksassociations.com/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप.असोसिएशन लि;
सोलापूर

# सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को.ऑप.असोसिएशन लि.; सोलापूर

**११३ (अ), सिद्धेश्वर पेठ, (एस.बी.आय. ट्रेझरी शेजारी) सोलापूर-४१३००१.**

पश्चिम महाराष्ट्रातील रुपये ५००० कोटी व्यवसायपूर्तीकडे वाटचाल असलेल्या अग्रगण्य शेड्यूल्ड सहकारी बँकेत विविध पदांकरिता सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप.असोसिएशन लि., सोलापूर यांचे माध्यमातून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज ऑनलाईन पद्धतीने दि.२४/०१/२०२४ रोजी सकाळी ११:०० ते दि.०५/०२/२०२४ रोजी रात्री ११:५९ वाजेपर्यंत भरुन पाठवावेत.

- **भरती प्रक्रियचे वेळापत्रक खालीलप्रमाणे राहील.**

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १) | ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्याचा कालावधी | दि.२४/०१/२०२४ रोजी सकाळी ११:०० ते दि.०५/०२/२०२४ रोजी रात्री ११:५९ वाजेपर्यंत. |
| २) | परीक्षा शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरण्याचा व संकेतस्थळावर अद्ययावत करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दि.०५/०२/२०२४ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत. |
| ३) | परीक्षा दिनांक | https://surbanksassociations.com/ या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. |
| ४) | परीक्षा प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याचा दिनांक | https://surbanksassociations.com/ या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. |
| ५) | मुलाखत दिनांक | https://surbanksassociations.com/ या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. |

- **महत्त्वाच्या सूचना**

१) परीक्षा शुल्क संकेतस्थळावर अद्ययावत केल्यानंतर अर्ज सादर (Final Submission) केल्याशिवाय रजिस्ट्रेशन प्रक्रिया पूर्ण होणार नाही. तसेच अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सदर अर्जाची प्रिंट काढून पुढील प्रक्रियेसाठी सोबत ठेवावी.

२) उमेदवारांकडे वैध ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक असावा, जो निवड प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वैध आणि सक्रिय राहिला पाहिजे. तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर (DND) असल्यामुळे संपूर्ण प्रक्रियेदरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणाऱ्या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आय.डी. व संदेशवहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना असोसिएशन व बँक जबाबदार राहणार नाही. सदर भरती प्रक्रियेदरम्यान असोसिएशनच्या संकेतस्थळावर वेळोवेळी अवलोकन करुन भरतीप्रक्रियेची अद्ययावत माहिती प्राप्त करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

३) उमेदवारांनी अर्ज भरताना संबंधित पदांसाठी आवश्यक पात्रता धारक असल्याची खात्री करुनच अर्ज भरावा. उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज भरताना आधार कार्ड, जन्मतारखेचा पुरावा म्हणून माध्यमिक/उच्च माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला अथवा जन्माचा दाखला, धारण केलेल्या सर्वाधिक शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र आणि वाहनचालक पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी वाहन चालविण्याचा परवाना इ.कागदपत्रे अर्जासोबत ऑनलाईन अपलोड करावीत.

४) ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्याचे पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक राहील. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरताना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास कोठेही व कोणत्याही प्रकारे तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती अर्ज एकदा सादर केल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाही.

५) सदर भरती प्रक्रियेदरम्यान संकेतस्थळावर असलेल्या सूचनांचे वेळोवेळी अवलोकन व पालन करुन भरती प्रक्रियेची अद्ययावत माहिती प्राप्त करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

६) इच्छुक उमेदवारांनी अर्जातील माहिती पूर्ण भरुन वैध ई-मेल आय.डी.सह विहित मुदतीत नोंदणी करावी.

७) उमेदवाराची बहुपर्यायी प्रश्नांची परीक्षा ही ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या पात्रतेनुसार कोणत्याही कागदपत्रांची पूर्व तपासणी/छाननी न करता घेण्यात येणार असल्याने, या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवारांना निवडीबाबत कोणताही हक्क राहणार नाही. कागदपत्रकांच्या पूर्ण छाननी व तपासणीनंतरच त्यांची वैधता पाहून उमेदवाराची पात्रता निश्चित करण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार असोसिएशनने व संबंधित बँकेने राखून ठेवलेले आहेत व याबाबत उमेदवारांना मागाहून कोणतीही तक्रार करता येणार नाही.

८) उमेदवारांना परीक्षा / कागदपत्रे पडताळणी व प्रत्यक्ष मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. आवश्यक असलेल्या पदांसाठी पात्र उमेदवारांची व्यक्तिगत मुलाखत घेण्यात येईल.

९) कोणत्याही परिस्थितीत उमेदवारांना त्यांचे परीक्षा शुल्क परत दिले जाणार नाही.

१०) परीक्षेचे ठिकाण व दिनांक, परीक्षेचे स्वरुप इ.बाबतची माहिती पात्र उमेदवारांना असोसिएशनच्या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

११) ऑनलाईन परीक्षा संपल्यानंतर तीन तासांच्या आत उत्तरसूची संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल. त्यासंबंधी काही आक्षेप असल्यास पुढील तीन दिवसांच्या आत संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या नमुन्यानुसार लेखी पत्राने कळविणे आवश्यक राहील. त्यानंतर आवश्यकता असल्यास योग्य तो बदल करुन सुधारित उत्तरसूची परीक्षा संपल्यापासून ५ दिवसाच्या आत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल. याबाबत असोसिएशन व बँकेचा निर्णय अंतिम राहील तसेच मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१२) लिपिक पदासाठी मुलाखतीचे वेळापत्रक उमेदवारांना असोसिएशनच्या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

१३) उमेदवाराने अर्जात नमूद केलेली सर्व माहिती व तपशील अचूक असावा. सदर माहिती अथवा तपशील चुकीचा अथवा खोटा आढळल्यास सदर उमेदवाराचा अर्ज नोकर भरती प्रकियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

१४) भरती प्रक्रियेत / निवड कार्यपद्धतीत बदल करण्याचा अधिकार असोसिएशन व संबंधित बँकेस असेल व ऐनवेळी त्यात काही बदल झाल्यास तो संकेतस्थळावर प्रसिद्ध केला जाईल. याबाबत अर्ज केलेल्या उमेदवारांना पत्राने लेखी स्वरुपात कळविले जाणार नाही.

१५) सदर जाहिरातीमध्ये नमूद पदांची संख्या बँकेच्या आवश्यकतेनुसार कमी / जास्त होऊ शकते. नोकर भरती विषयक सर्वाधिकार असोसिएशन व संबंधित बँक राखून ठेवत असून संपूर्ण अथवा अंशत: भरती प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार देखील असोसिएशन व संबंधित बँक राखून ठेवत आहे.

* **पदांचा तपशील**

➢ **पदाचे नाव : लिपिक**

* **एकूण पदे–** १४०
* **नोकरीचे ठिकाण–** सातारा, सांगली, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, रत्नागिरी व रायगड जिल्हे आणि मुंबई व तिची उपनगरे
* **शैक्षणिक पात्रता–**

१) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी
२) MS_CIT किंवा Equivalent Certification Course
३) दि.३१ डिसेंबर २०२३ रोजी शैक्षणिक अर्हता प्राप्त असलेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र असतील.
४) शैक्षणिक पात्रतेच्या परीक्षेचा निकाल जर फक्त विद्यापिठाच्या अधिकृत वेबसाईटवर अद्ययावत केला गेला असेल किंवा वेब आधारीत प्रमाणपत्र प्रदान केले गेले असेल तर उमेदवाराने त्या संदर्भात मूळ प्रमाणपत्र बँकेला सादर करणे आवश्यक राहील आणि त्यावर विद्यापिठाच्या अधिकृत अधिकाऱ्याने सदरहू उमेदवार परीक्षेत उत्तीर्ण झाल्याची तारीख दर्शवून स्वाक्षरी करणे आवश्यक राहील.

* **वयोमर्यादा–** दि.३१ डिसेंबर २०२३ रोजी किमान २२ ते कमाल ३५ वर्षे
* **प्राधान्य –** बी.कॉम/एम.कॉम/एम.बी.ए./JAIIB/CAIIB/GDC&A तसेच शासन मान्यताप्राप्त इतर संस्थेची बँकिंग/ सहकार /कायदेविषयक पदविका/Banking Course
* **अनुभव–** बँका/पतसंस्था किंवा वित्तीय संस्थांमधील कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य
* **भाषेचे ज्ञान–** मराठी/इंग्रजी/हिंदी भाषा लिहिण्यामध्ये व बोलण्यामध्ये प्रभुत्व.
* **वेतन–** बँक नियमानुसार

➢ **पदाचे नाव : शिपाई**

* **एकूण पदे–** १५
* **नोकरीचे ठिकाण–** सातारा, सांगली, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, रत्नागिरी व रायगड जिल्हे आणि मुंबई व तिची उपनगरे
* **शैक्षणिक पात्रता–**

१) किमान १० वी उत्तीर्ण
२) दि.३१ डिसेंबर २०२३ रोजी शैक्षणिक अर्हता प्राप्त असलेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र असतील.

* **वयोमर्यादा–** दि.३१ डिसेंबर २०२३ रोजी किमान २१ आणि कमाल ३३ वर्षे
* **वेतन–** बँक नियमानुसार

- **पदाचे नाव : वाहनचालक**
  - **एकूण पदे–** ४
  - **नोकरीचे ठिकाण–** सातारा, सांगली, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, रत्नागिरी व रायगड जिल्हे आणि मुंबई व तिची उपनगरे
  - **शैक्षणिक पात्रता–**
    १) किमान ८ वी उत्तीर्ण (चार चाकी वाहन चालविण्याचा (TR/NT) परवाना आवश्यक)
    २) दि.३१ डिसेंबर २०२३ रोजी शैक्षणिक अर्हता प्राप्त असलेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र असतील.
  - **वयोमर्यादा–** दि.३१ डिसेंबर २०२३ रोजी किमान २५ आणि कमाल ४० वर्षे
  - **अनुभव–** चार चाकी वाहन चालविण्याचा किमान ३ वर्षांचा अनुभव.
  - **वेतन–** बँक नियमानुसार

- **पदाचे नाव : सुरक्षा रक्षक**
  - **एकूण पदे–** ५०
  - **नोकरीचे ठिकाण–** सातारा, सांगली, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, रत्नागिरी व रायगड जिल्हे आणि मुंबई व तिची उपनगरे
  - **शैक्षणिक पात्रता–**
    १) किमान ७ वी उत्तीर्ण
    २) दि.३१ डिसेंबर २०२३ रोजी शैक्षणिक अर्हता प्राप्त असलेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र असतील.
  - **वयोमर्यादा–** दि.३१ डिसेंबर २०२३ रोजी किमान २१ आणि कमाल ४५ वर्षे
  - **वेतन–** बँक नियमानुसार

## • निवड कार्यपद्धती–

१) **परीक्षा–**

लिपिक पदाकरिता १०० गुणांची बहुपर्यायी प्रश्नांची परीक्षा ऑनलाईन पद्धतीने मराठी/इंग्रजी माध्यमातून घेण्यात येईल. बहुपर्यायी प्रश्नांमध्ये गणित ४० गुण, बौद्धिक चाचणी २० गुण, सामान्य ज्ञान २० गुण, संगणक १० गुण व इंग्रजी १० गुण असे उच्च माध्यमिक स्तरावरील प्रश्न असतील. परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक विषयात किमान ५०% गुण मिळवणे आवश्यक राहील याची नोंद घ्यावी. तद्नंतर १०० पैकी प्राप्त गुणांचे ९० च्या गुणोत्तरामध्ये रुपातंर करण्यात येईल.

तसेच इतर पदांसाठी मराठी माध्यमातून सामान्य ज्ञान व कामकाजाच्या स्वरुपावर आधारीत ५० गुणांची बहुपर्यायी स्वरुपामध्ये परीक्षा घेण्यात येईल.

२) **कागदपत्रे पडताळणी–**

परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारास ऑनलाईन परीक्षेतील गुणांच्या उतरत्या क्रमवारीनुसार बँक धोरणाप्रमाणे मुलाखतीपूर्वी शैक्षणिक व इतर संबंधित मूळ प्रमाणपत्रकांची प्राथमिक कागदपत्रे पडताळणीसाठी बोलविण्यात येईल. त्यावेळी उमेदवाराने मूळ कागदपत्रे उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. प्राथमिक कागदपत्रे पडताळणीमध्ये लिपिक पदासाठी पात्र होणाऱ्या उमेदवारास बँक धोरणाप्रमाणे बँकेकडून मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. इतर पदांसाठी मुलाखतीची आवश्यकता नाही.

३) **मुलाखत–**

लिपिक पदाकरीता उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांना बँकेच्या धोरणानुसार भरावयाच्या पदसंख्येच्या प्रमाणात ऑनलाईन परीक्षेतील गुणाणुक्रमे मौखिक मुलाखतीस बोलविण्यात येईल. मौखिक मुलाखतीकरीता १० गुण (शैक्षणिक पात्रतेसाठी ५ गुण व मौखिक मुलाखतीकरिता ५ गुण) राहतील. मुलाखतीस गैरहजर राहिल्यास संबंधित उमेदवार अंतिम निवडीस (परीक्षेत उत्तीर्ण झालेला असला तरी) पात्र राहणार नाही.

४) **उमेदवाराची अंतिम निवड सूची–**

लिपिक पदासाठीच्या उमेदवाराचे ऑनलाईन परीक्षेतील गुण अधिक मुलाखतीचे गुण याची बेरीज करुन एकूण १०० गुणांपैकी गुणानुक्रमे अंतिम निवड सूची तयार करण्यात येईल. तसेच इतर पदांसाठी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची मूळ कागदपत्रे पडताळणी झाल्यानंतर पात्र उमेदवारांची अंतिम निवड यादी प्रसिद्ध केली जाईल.

**परीक्षा शुल्क–** परीक्षा शुल्क रु.१,०००/- अधिक १८% जी.एस.टी. असे एकूण १,१८०/- (विना परतावा) (Online Payment) अर्ज सादर करताना ऑनलाईन पद्धतीने परीक्षा शुल्क स्वीकारले जाईल.

उमेदवारांना अर्ज भरताना अडचणी/शंका असल्यास संकेतस्थळावर उपलब्ध असणाऱ्या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क करुन अडचणी/शंकाचे निरसन करावे.

***********

- **पदांचा तपशील आणि महत्त्वाच्या सूचना खालीलप्रमाणे आहेत**

**१) लिपिक**

| | |
|---|---|
| पदाचे नाव | लिपिक |
| एकूण पदे | १४० |
| नोकरीचे ठिकाण | सातारा, सांगली, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, रत्नागिरी व रायगड जिल्हे आणि मुंबई व तिची उपनगरे |
| वयामर्यादा | दि.३१ डिसेंबर २०२३ रोजी किमान २२ ते कमाल ३५ वर्षे |
| शैक्षणिक अर्हता (अनिवार्य) | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी<br>२) MS_CIT किंवा Equivalent Certification Course |
| भाषेचे ज्ञान | मराठी/इंग्रजी/हिंदी भाषा लिहिण्यामध्ये व बोलण्यामध्ये प्रभुत्व असावे. |
| वेतन | बँक नियमानुसार |
| प्राधान्य | बी.कॉम/एम.कॉम/एम.बी.ए./JAIIB/CAIIB/GDC&A तसेच शासन मान्यताप्राप्त इतर संस्थेची बँकिंग/ सहकार /कायदेविषयक पदविका/ Banking Course |
| भरती प्रक्रिया | १) उमेदवारांची १०० गुणांची बहुपर्यायी स्वरुपाची लेखी परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येईल.<br>२) परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची मुलाखतीद्वारे निवड केली जाईल. |
| परीक्षेचे स्थळ | सातारा |
| शुल्क | रु.१,०००/- अधिक १८% जी.एस.टी. असे एकूण १,१८०/- (विना परतावा) (Online Payment) |
| ऑनलाईन अर्ज सुरु होण्याची तारीख | २४/०१/२०२४ (सकाळी ११:०० पासून) |
| अर्ज करण्याची शेवटची तारीख | ०५/०२/२०२४ (रात्री ११:५९ वाजेपर्यंत) |

## २) शिपाई

| | |
|---|---|
| पदाचे नाव | शिपाई |
| एकूण पदे | १५ |
| नोकरीचे ठिकाण | सातारा, सांगली, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, रत्नागिरी व रायगड जिल्हे आणि मुंबई व तिची उपनगरे |
| वयामर्यादा | दि.३१ डिसेंबर २०२३ रोजी किमान २१ आणि कमाल ३३ वर्षे |
| शैक्षणिक अर्हता (अनिवार्य) | किमान १० वी उत्तीर्ण |
| वेतन | बँक नियमानुसार |
| प्राधान्य | – |
| भरती प्रक्रिया | १) उमेदवारांची ५० गुणांची बहुपर्यायी स्वरुपाची परीक्षा घेण्यात येईल.<br>२) परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांच्या कागदपत्रे पडताळणीनंतर अंतिम निवड केली जाईल. |
| परीक्षेचे स्थळ | सातारा |
| शुल्क | रु.१,०००/- अधिक १८% जी.एस.टी. असे एकूण १,१८०/- (विना परतावा) (Online Payment) |
| ऑनलाईन अर्ज सुरु होण्याची तारीख | २४/०१/२०२४ (सकाळी ११:०० पासून) |
| अर्ज करण्याची शेवटची तारीख | ०५/०२/२०२४ (रात्री ११:५९ वाजेपर्यंत) |

३) **वाहनचालक**

| | |
|---|---|
| पदाचे नाव | वाहनचालक |
| एकूण पदे | ४ |
| नोकरीचे ठिकाण | सातारा, सांगली, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, रत्नागिरी व रायगड जिल्हे आणि मुंबई व तिची उपनगरे |
| वयामर्यादा | दि.३१ डिसेंबर २०२३ रोजी किमान २५ आणि कमाल ४० वर्षे |
| शैक्षणिक अर्हता (अनिवार्य) | किमान ८ वी उत्तीर्ण (चार चाकी वाहन चालविण्याचा (TR/NT) परवाना आवश्यक) |
| वेतन | बँक नियमानुसार |
| प्राधान्य | चार चाकी वाहन चालविण्याच्या परवान्यासह किमान ३ वर्षांचा अनुभव. |
| भरती प्रक्रिया | १) उमेदवारांची ५० गुणांची बहुपर्यायी स्वरुपाची परीक्षा घेण्यात येईल.<br>२) परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांच्या कागदपत्रे पडताळणीनंतर अंतिम निवड केली जाईल. |
| परीक्षेचे स्थळ | सातारा |
| शुल्क | रु.१,०००/- अधिक १८% जी.एस.टी. असे एकूण १,१८०/- (विना परतावा) (Online Payment) |
| ऑनलाईन अर्ज सुरु होण्याची तारीख | २४/०१/२०२४ (सकाळी ११:०० पासून) |
| अर्ज करण्याची शेवटची तारीख | ०५/०२/२०२४ (रात्री ११:५९ वाजेपर्यंत) |

## ४) सुरक्षा रक्षक

| | |
|---|---|
| पदाचे नाव | सुरक्षा रक्षक |
| एकूण पदे | ५० |
| नोकरीचे ठिकाण | सातारा, सांगली, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, रत्नागिरी व रायगड जिल्हे आणि मुंबई व तिची उपनगरे |
| वयामर्यादा | दि.३१ डिसेंबर २०२३ रोजी किमान २१ आणि कमाल ४५ वर्षे |
| शैक्षणिक अर्हता (अनिवार्य) | किमान ७ वी उत्तीर्ण |
| वेतन | बँक नियमानुसार |
| प्राधान्य | – |
| भरती प्रक्रिया | १) उमेदवारांची ५० गुणांची बहुपर्यायी स्वरुपाची परीक्षा घेण्यात येईल.<br>२) परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांच्या कागदपत्रे पडताळणीनंतर अंतिम निवड केली जाईल. |
| परीक्षेचे स्थळ | सातारा |
| शुल्क | रु.१,०००/- अधिक १८% जी.एस.टी. असे एकूण १,१८०/- (विना परतावा) (Online Payment) |
| ऑनलाईन अर्ज सुरु होण्याची तारीख | २४/०१/२०२४ (सकाळी ११:०० पासून) |
| अर्ज करण्याची शेवटची तारीख | ०५/०२/२०२४ (रात्री ११:५९ वाजेपर्यंत) |